**नमुना एफएल-३ अंतर्गत संलग्न (कम्पोझीट)**
**अनुज्ञप्ती मंजुरीबाबत.**

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
शासन परिपत्रक क्र. बीपीए०८१९/प्र.क्र.१४६ (भाग-१)/राउशु-२,
दिनांक :-१९.०९.२०१९

परिपत्रक

राज्य उत्पादन शुल्क विभाग हा राज्य शासनाचा राजस्व विभाग आहे १९४९,महाराष्ट्र दारुबंदी कायदा . मधील तरतुदीनुसार मद्य, मद्यार्क उत्पादन व विक्री तसेच यासाठी लागणारे कच्चे पदार्थ यांच्याशी संबंधित विविध अनुज्ञप्त्या मंजूर करण्याचे व नियंत्रण ठेवण्याचे अधिकार या विभागास आहेत .सदर क्षेत्रामधुन राज्य . .शासनास महसुल प्राप्त होतो या क्षेत्रातील उद्योगास वेगवेगळया परवानग्या मिळण्यास विलंब होत असल्याच्या सुचना अशा .निवेदन प्राप्त होत आहेत/अडचणींमुळे उद्योगाच्या कार्यप्रणालीवर पर्यायाने शासनाच्या महसुलावर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास येत आहे. गतीमान प्रशासन व उद्योगधंद्यांना Ease of Doing Business या धोरणांतर्गत कालबाहय नियम व प्रचलित पध्दतीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे असे जाणवते.

त्याअनुषंगाने शासनाने स्थापन केलेल्या कार्यगटाच्या शिफारशी स्विकारण्यात आल्या असुन पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१. एफएल-३ अनुज्ञप्ती मंजुर असलेल्या आस्थापनेत स्वतंत्र कक्ष उपलब्ध असल्यास, अनुज्ञप्तीधारकाने स्वतंत्र कक्षाकरीता (उदा.बॅंकवेट हॉल) मद्य वितरणाकरीता अनुज्ञप्तीचा प्रस्ताव सादर केल्यास, स्वतंत्र कक्षाकरिता संलग्न एफएल-३ अनुज्ञप्ती मंजूर करण्यात यावी. या अनुज्ञप्तीकरीता अनुज्ञप्ती शुल्काच्या २५ % इतके अनुज्ञप्ती शुल्क आकारण्यात यावे. तारांकित आस्थापना (हॉटेल) मध्ये स्वतंत्र कक्ष उपलब्ध असल्यास या स्वतंत्र कक्षाकरीता (उदा.बॅंकवेट हॉल) मद्य वितरणासाठी अनुज्ञप्तीचा प्रस्ताव घटकाने सादर केल्यास, स्वतंत्र कक्षाकरिता संलग्न एफएल-३ अनुज्ञप्ती मंजूर करावी. या अनुज्ञप्तीकरीता मुळ अनुज्ञप्ती शुल्काच्या ५० % इतके

Point no 61

शुल्क आकारावे. सदर मंजूर केलेली संलग्न एफएल-३ अनुज्ञप्ती ही ज्या स्वतंत्र कक्षाकरिता मंजूर केली जाईल,तो कक्ष विषेश कार्यक्रमाकरीता असेल. अशा संलग्न अनुज्ञप्ती ठिकाणी स्वतंत्र खाद्यगृह नसावे तसेच स्वतंत्र कक्ष अनुज्ञप्ती ही pool side च्या ठिकाणी नसेल याबाबत खातरजमा करण्यात यावी.

२. एफएल-३ अनुज्ञप्ती मंजुर असलेल्या तसेच सदर एफएल-३ अनुज्ञप्तीचा व आस्थापनेतील इतर जागा /क्षेत्र ही सदर एफएल-३ अनुज्ञप्तीधारकाच्या नावे असल्यास केवळ अशा आस्थापनेसच संलग्न (कम्पोझीट) अनुज्ञप्ती मंजुर करण्यात येईल.

३. ज्या आस्थापनेस एफएल-३ अनुज्ञप्ती मंजूर नाही अशा इतर आस्थापनेच्या बॅन्कवेट हॉल मध्ये विशेष कार्यक्रमासाठी एफएल-४-अ अनुज्ञप्ती मंजुर करुन घेणे अनिवार्य राहील.

पु.हि.वागदे

( पु. हि. वागदे )

सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
३) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
४) निवडनस्ती, राज्य उत्पादन शुल्क-२, गृह विभाग.